# कार्यालय, नागपूर महानगरपालिका, नागपूर

## शिक्षण विभाग

दुरध्वनी क्र. 0712–2567028
EmailID:education.nmc@gmail.com

जा.क्र. 3605 /शि.वि./2017
दि. 21/01/2017

**प्रति,**

मुख्याध्यापक / मुख्याध्यापिका,
सर्व प्राथ. / उच्च प्राथ. / माध्य. शाळा,
म.न.पा., नागपूर.

**विषय :– सर्व शिक्षा अभियान अतंर्गत शाळा व्यवस्थापन समिती अद्ययावत करण्याबाबत.**

उपरोक्त विषयाच्या अनुषंगाने आपणांस कळविण्यात येते की, सर्व शिक्षा अभियान अंतर्गत शालेय कार्यावर देखरेखीकरीता शाळा व्यवस्थापन समितीची निर्मीती करण्यात येते. या समितीमध्ये घेण्यात येणारे पालक प्रतिनिधी यांचे पाल्य / मूले त्या शाळेमध्ये चालू सत्रात इयत्ता 1 ते 8 वी मध्ये शिकत असणे आवश्यक आहे. ज्या पदाधिकाऱ्याची पाल्य / मूले या चालू सत्रात शिकत नसतील तर त्यांचे जागेवर दुसऱ्या विद्यार्थ्यांच्या पालकांची नियुक्ती करावी. दरवर्षी याप्रमाणे कार्यवाही करून आवश्यकता पडल्यास शाळा व्यवस्थापन समिती अद्ययावत करावी व त्याची प्रत शाळा निरीक्षक यांचेकडे सादर करावी. योग्य अमंलबजावणी न केल्यास सर्वस्वी मुख्याध्यापकांना जबाबदार धरण्यात येईल.

तसेच शालेय विद्यार्थ्यांच्या सुरक्षेच्या दृष्टीकोनातून शाळेमध्ये बाहेरील अनधिकृत शिक्षक नियुक्त करू नये याबाबत कार्यालयामार्फत आपणांस सूचित करण्यात आले होते. शाळा भेटी दरम्यान जर असे निदर्शनास आले तर मुख्याध्याकांवर कठोर कार्यवाही करण्यात, येईल याची नोंद घ्यावी.

(फारूक अहमद खान)
**शिक्षणाधिकारी,**
**महानगरपालिका, नागपूर.**

**प्रतिलिपी :–**

1) मा.उपायुक्त–1, म.न.पा., नागपूर यांना सविनय माहितीस्तव सादर.
2) शाळा निरीक्षक, झोन क्र. 1 ते 10, यांना कार्यवाहीस्तव.